done

माझ तक्रार


महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१
❖ दुरध्वनी क्र : ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२ ❖ फॅक्स क : ०२१४१-२२७४५१ ❖
❖ ई-मेल : tahasildarmahasul@gmail.com ❖


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक:मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार/२०२३ दिनांक: ३१/०७/२०२३

प्रति,

मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड ईस्टेट,
फोर्ट, मुंबई-४००००१.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क: 2298 दिनांक: 7 SEP 2023
शासकीय अधिकारी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

mangrove Team

2 SEP 2023

**विषय:- Destruction of Magroves in Nhavekhadi, near Ulwe, Node Navi Mumbai (तक्रार क्रमांक २२४)**

संदर्भ:- आपलेकडील पत्र जा.क्र./लं.ले./कां.स/३०२/सन २०२३-२४
दिनांक ०६/०४/२०२३

उपरोक्त विषयान्वये अर्जदार श्री.बी.एन.कुमार यांनी आपल्या कार्यालयाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने तहसिलदार पनवेल यांनी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांजकडे सादर केलेल्या अहवालान्वये उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी त्यांचेकडील दि. ०३/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये खालील नमुन्यात अहवाल सादर केलेला आहे.

**कांदळवन/पाणथळ तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशिल | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १. | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.वैभव प्रदिप म्हात्रे दिनांक ०१/०४/२०२३ |
| २. | तक्रारीचा विषय | Destruction of Magroves in Nhavekhadi, near Ulwe, Node Navi Mumbai |
| ३. | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा.स.नं.गावाचे नांव, तालुका | मौजे न्हावे येथील रामबाग बागेच्या मागील प्रवेशव्दाराच्या जवळ स.नं.१४/२ |
| ४. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | १) मंडळ अधिकारी, ओवळे<br>२) वनपाल घारापूरी (अति.कार्य.कांदळवन) |
| ५. | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | १) मौजे न्हावे खाडी उत्तरपाडा येथील स.नं.१४/२ हा सिडको मालकीचा असून सदर जमीन मिळकत सिडकोसाठी संपादित झाली आहे. प्रत्यक्ष स्थळपाहणीवेळी कांदळवन वृक्षाची तोड केल्याचे दिसुन येत नाही.<br>२) मौजे न्हावे खाडी येथील मोरी/उघड यांचे काम सिडकोमार्फत करण्यात आले आहे. सदर मोरी/उघड समुद्राचे भरती पाण्यापासून गावाच्या संरक्षण होण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. सदर मोरीमुळे कांदळवनाचा ऱ्हास झालेची बाब निदर्शनास आलेली नाही.<br>३) सदर जागेवर भराव नसून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता आहे. संयुक्त स्थळपाहणीवेळी किटकनाशकाचा वापर करुन खारफुटी नष्ट झालेची बाब दिसून आली नाही.<br>४) स.नं.३/अ/७४० हा सिडको मालकीचा असून संयुक्त स्थळपाहणीवेळी खारफुटी व खाडीमध्ये सिमेंट मिक्सर पाणी टाकलेची बाब दिसून आली नाही. |

| | | |
|---|---|---|
| ६. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही. |
| ७. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | निरंक |
| ८. | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | निरंक |
| ९. | कोणत्या कायद्या अंतर्गत/कलमा अंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील चौकशी अहवालाची त्यासोबतची कागदपत्रे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहेत.

(डॉ. योगेश म्हसे)
**जिल्हाधिकारी रायगड**

अहवाल. (224)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सिडको
शहरांचे शिल्पकार

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)


**नोंदणीकृत कार्यालय :**
'निर्मल' दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ००-९१-२२-६६५० ०९००
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९

**मुख्य कार्यालय :**
'सिडको' भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६


संदर्भ क्र. क्र. सिडको/का.अ. (उलवे-II)/२०२३/617

दिनांक : दि. १७/०७/२०२३

## अहवाल

**विषय:- खारफूटीची कत्तल व समुद्राचे पाणी अडवून खारफुटी वृक्षास पाणी पुरवठा खंडित केल्याबाबत अहवाल.**

संदर्भ :-१. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. १२.०४.२०२३.
२. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. ०६.०६.२०२३.
३. पत्र क्र. सिडको/महा. व्य. (वने)/२०२३/ई/२२४६७९ दि. २७.०६.२०२३.
४. जा.क्र.ब/कांदळवन तक्रार/४७६/२०२३-२४ दि. १७.०५.२०२३ रोजीचा परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचे पत्र.
५. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०७०, दि. १२.०७.२०२३

महोदय,

अज्ञात व्यक्तीकडून खारफुटी वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल व रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील (मोरी /उघड) येथे पाईप चा फ्लो पत्रा टाकून खंडित केल्याबद्दल व सिमेंट कॉंक्रिट मिक्सव्दारे शिल्लक कॉंक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकत आहेत अशी माहिती तक्रारदार श्री. वैभव राघो म्हात्रे यांनी सिडकोला कळविली होती.

यासंदर्भात सिडको कार्यकारी अभियंता (उलवे-२) यांनी पत्र क्र. सिडको/का. अ.(उलवे-२)/२०२३/३४९/ई-२०८०१९, दि. १०.०५.२०२३ सिडकोचे उलवे येथील सुरक्षा अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पत्र पाठविले होते.

यानंतर सिडकोने वरील तक्रारीची खातरजमा करण्यासाठी एक समिती तयार केली. सदर समितीमध्ये नियोजन, भूमी, अभियांत्रिकी व अनधिकृत बांधकामे विभाग यांचे प्रतिनिधी होते. सदर समितीने दि. १९.५.२०२३ रोजी नमूद ठिकाणची पाहणी केली व पाहणी नंतर खालील निर्णय घेण्यात आले आहेत.

१. जमिन भराव व खारफुटी वृक्षाची तोड व कत्तल थांबविण्यासाठी सिडकोतर्फे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासंदर्भात सुरक्षा अधिकारी यांना कळविण्यात आले.

२. रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील पाण्याचे प्रवाह खंडित न करण्यासाठी सिडकोचे अधिकारी दर महिन्याला न्हावा खाडी येथील फ्लॅप गेट येथे भेट देवून पाहणी करतील व पाणी नियंत्रित आहे किंवा कसे याचे निरीक्षण करतील.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई
आवक क्र: 1418 दिनांक: 24 JUL 2023
प्रशासकीय अधिकारी    अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
पृ.१/२.

३. सिमेंट कॉंक्रिट मिक्सरमधील शिल्लक कॉंक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकल्याचे आढळले नाही. परंतु अज्ञात व्यक्तीव्दारे रिकामे कॉंक्रिट मिक्सर तिथेच धुतल्याचे आढळले. अशी भविष्यात घटना पुन्हा घडू नये यासाठी सिडको सुरक्षा रक्षकांना सुचना करण्यात आली.

वरील माहिती तक्रारदार श्री. वैभव राघो म्हात्रे यांना पत्र क्र. सिडको/का.अ. (उलवे-२)/२०२३/५११, दि. २०.०६.२०२३ व्दारे कळविले आहे.

त्या अनुषंगाने मौजे न्हावे (उत्तरपाडा), ता. पनवेल येथे दि. २६/०६/२०२३ रोजी सिडको अधिकारी व परिक्षेत्र वन विभागातील अधिकारी श्री. चंद्रकांत शंकर मोरे यांच्यासमवेत कत्तल केलेले कांदळवनच्या ठिकाणी नवीन खारफुटी वृक्ष लागवड करण्यासाठी संयुक्त भेट दिली. या भेटीत सुकलेली खारफुटी काढून त्या ठिकाणी नवीन पाच हजार (५०००) खारफुटी न्हावे (उत्तरपाडा) येथे लावावी असे परिक्षेत्र वन विभागातुन आलेल्या आधिकारी यांनी सुचविले.

तसेच यासंदर्भात महाव्यवस्थापक (वने) विभाग, सिडको यांनी परिक्षेत्र वनअधिकारी (उरण) यांना पत्र क्र. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०७०, दि. १२.०७.२०२३ या तारखेला पत्र लिहून सदर ठिकाणी भरती ओहोटीचा प्रवाह तात्काळ सुरु करुन Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन संधारण घटक विभागाच्या सहाय्याने कांदळवन लागवड करण्यासाठी पुढील कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

तरी पुढील अहवाल अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर.

(वि. ल. पितळे)
कार्यकारी अभियंता (उलवे-II)
१ला मजला, उन्नती कमर्शियल कॉम्प्लेक्स,
सेक्टर १९ए, उलवे नोड
नवी मुंबई ४१० २०६

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)

**नोंदणीकृत कार्यालय :**
'निर्मल' दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ००-९१-२२-६६५० ०९००
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९

**मुख्य कार्यालय :**
'सिडको' भवन, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६

क्र. सिडको/का.अ. (उलवे-II)/२०२३/616

दि. १७/०७/२०२३

संदर्भ क्र.

दिनांक :

प्रती,

श्री. एन. जी. कोकरे
परिक्षेत्र वन अधिकारी, उरण
जे.एन.पी.टी. टाऊनशीप, सेक्टर-२, बी-५८,
रुम नं.२, ता. उरण जि. रायगड-४००७०७

**विषय:- खारफूटीची कत्तल व समुद्राचे पाणी अडवून खारफुटी वृक्षास पाणी पुरवठा खंडित केल्याबाबत.**

संदर्भ :-१. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. १२.०४.२०२३.
२. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. ०६.०६.२०२३.
३. पत्र क्र. सिडको/महा. व्य. (वने)/२०२३/ई/२२४६७९ दि. २७.०६.२०२३.
४. जा.क्र.ब/कांदळवन तक्रार/४७६/२०२३-२४ दि. १७.०५.२०२३ रोजीचा परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचे पत्र.
५. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०७०, दि. १२.०७.२०२३

महोदय,

उरोक्त विषयान्वये संदर्भिय पत्र क्र. १ नुसार आपण अज्ञात व्यक्तीकडून खारफुटी वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल व रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील (मोरी /उघड) येथे पाईप चा फ्लो पत्रा टाकून खंडित केल्याबद्दल व सिमेंट काँक्रिट मिक्सव्दारे शिल्लक काँक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकत आहेत अशी माहिती तक्रारदार श्री. वैभव राघो म्हात्रे यांनी सिडकोला कळविली होती.

सिडको कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र. सिडको/का. अ.(उलवे-२)/२०२३/३४९/ई-२०८०१९, दि. १०.०५.२०२३ सिडकोचे उलवे येथील सुरक्षा अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पत्र पाठविले होते.

यानंतर सिडकोने वरील तक्रारीची खातरजमा करण्यासाठी एक समिती तयार केली. सदर समितीमध्ये नियोजन, भूमी, अभियांत्रिकी व अनधिकृत बांधकामे विभाग यांचे प्रतिनिधी होते. सदर समितीने दि. १९.५.२०२३ रोजी नमूद ठिकाणची पाहणी केली व पाहणी नंतर खालील निर्णय घेण्यात आले आहेत.

१. जमिन भराव व खारफुटी वृक्षाची तोड व कत्तल थांबविण्यासाठी सिडकोतर्फे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासंदर्भात सुरक्षा अधिकारी यांना कळविण्यात आले. (पृष्ठ क्र. C/1 )

२. रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील पाण्याचे प्रवाह खंडित न करण्यासाठी सिडकोचे अधिकारी दर महिन्याला न्हावा खाडी येथील फ्लॅप गेट येथे भेट देवून पाहणी करतील व पाणी नियंत्रित आहे किंवा कसे याचे निरीक्षण करतील.

विमोज

३. सिमेंट काँक्रिट मिक्सरमधील शिल्लक काँक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकल्याचे आढळले नाही. परंतु अज्ञात व्यक्तीव्दारे रिकामे काँक्रिट मिक्सर तिथेच धुतल्याचे आढळले. अशी भविष्यात घटना पुन्हा घडू नये यासाठी सिडको सुरक्षा रक्षकांना सुचना करण्यात आली.

वरील माहिती आपण तक्रारदार श्री. वैभव राघो म्हात्रे यांना पत्र क्र. सिडको/का.अ. (उलवे-२)/२०२३/५११, दि. २०.०६.२०२३ व्दारे कळविले आहे.

त्या अनुषंगाने मौजे न्हावे (उत्तरपाडा), ता. पनवेल येथे दि. २६/०६/२०२३ रोजी सिडको अधिकारी व परिक्षेत्र वन विभगातील अधिकारी श्री. चंद्रकांत शंकर मोरे यांच्यासमवेत कत्तल केलेले कांदळवनच्या ठिकाणी नवीन खारफुटी वृक्ष लागवड करण्यासाठी संयुक्त भेट दिली. या भेटीत सुकलेली खारफुटी काढून त्या ठिकाणी नवीन पाच हजार (५०००) खारफुटी न्हावे (उत्तरपाडा) येथे लावावी असे परिक्षेत्र वन विभागातुन आलेल्या आधिकारी यांनी सुचविले.

पुढे आपण महाव्यवस्थापक (वने) यांना Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन लागवड कशाप्रकारे करावी, यासाठी पत्र क्र. सिडको/का.अ.(उलवे-II)/२०२३/५४४/ई- २२१८६६, दि. २७/०६/२०२३ रोजी पत्र पाठविले होते. महाव्यवस्थापक (वने) विभाग यांनी परिक्षेत्र वनअधिकारी (उरण) यांना पत्र क्र. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०७०, दि. १२.०७.२०२३ या तारखेला पत्र लिहून सदर ठिकाणी कांदळवन संधारण घटक विभागाच्या सहाय्याने कांदळवन लागवड करण्यासाठी पुढील कार्यवाही करावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की, आपण कांदळवन लागवड करण्यासाठी त्वरीत सिडकोला पत्राव्दारे महाव्यवस्थापक (वने) या विभागाला कत्तल केलेल्या कांदळवनच्या ठिकाणी नवीन खारफुटी वृक्ष लागवड करण्यासाठी कळवावे.

आपला विश्वासु

(वि. ल. पितळे)
कार्यकारी अभियंता (उलवे-II)
१ला मजला, उन्नती कमर्शियल कॉम्प्लेक्स,
सेक्टर १९ए, उलवे नोड
नवी मुंबई ४१० २०६

प्रत

राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवन संरक्षण कांदळवन कक्ष, मुंबई

उप वन संरक्षण कांदळवन कक्ष
महाव्यवस्थापक (वने)
अधिक्षक अभियंता (द्रोणागिरी व उलवे)
अति. मुख्य अभियंता (I)
मुख्य अभियंता (नवी मुंबई)
वरिष्ठ नियोजनकार (Environmental Cell)

CIDCO/EE(UL-II)/2023/509/E-218830 Date:-16.06.2023

**Sub: Providing Security near Rambagh, Nhave to prevent mangroves destruction**

Ref: 1) Letter no. Nil from Shri Vaibhav Ragho Mhatre (mob no. 8879472649) dtd 10.04.2023
2) Letter no. CIDCO/EE(UL-II)/2023/349/EO-208019 dated 10.05.2023 issued to Security officer(Ulwe)
3) Joint visit report on 19.05.2023 of Lands, Engineering, GM(forest), Planning(S), Planning (Environment cell) and CUC department.

With reference to above referred complaint letter from Mr Vaibhav Ragho Mhatre mentioned in reference no 1 regarding destruction of mangroves, etc. the Security officer(Ulwe) was intimated to take action against the complaint vide Letter referred at Ref. 2 above.

Later, a committee was formed to inspect the site and verify the complaint of Mr. Vaibhav Ragho Mhatre comprising of Lands, Engineering, GM(forest), Planning(S), Planning (Environment cell) and CCUC department to decide on further course of action on above complaint. A joint visit was done on 19.05.2023 of the representatives of Lands, Engineering, GM(forest), Planning(S), Planning (Environment cell) and CCUC department to verify the complaint and to decide on further course of action on above complaint.

The site visit report of the committee is enclosed herewith wherein It was decided to increase surveillance by security in this area and also to deploy security officers to avoid dumping of debris in future.

Further, Land Department have informed that the as per records the said land under mangroves is acquired by CIDCO but record of land acquisition (taba pavti) is not available but 7/12 extract shows CIDCO acquired land.

In view of the above, Security officer (CIDCO) is requested to take necessary action at the earliest for increasing surveillance in the said mangroves area to avoid destruction of mangroves an also to deploy security officers to avoid dumping of debris in future.

Encl: As above

(V.L. Pitale)
EE (UL-II)

सिडको अ. अ. (उलवे व ड्रेनेज)
जावक क्रं. E.O.-
दि. 16/6/23

Through

SE(B&U) 16/6/23

To,

Security officer (CIDCO)

CC to:

CE(NM)/ACE(I)

CCUC

GM(Env) /CLSO(LA)/ GM(forest)/ Sr. Planner(S), Sr. Planner(Environment cell)

Security Officer (Ulwe)

CIDCO/EE(UL-II)/2023/ 408/E-211464 Date:-19.05.2023

Sub: **Joint Site visit Report on complaint by Shri Vaibhav Ragho Mhatre regarding destruction of mangroves near Nhave**

Ref: **Letter no. Nil from Shri Vaibhav Ragho Mhatre ( mob no. 8879472649) dtd 10.04.2023**

With reference to above referred complaint letter dtd. 05.04.2023 from Mr Vaibhav Raghò Mhatre of Nhave stating following complaints: -

1) Filling of plot taking place near crematorium side by unknown person
2) Obstruction of the tidal flow resulting in destruction of Mangroves
3) Concrete mixer throwing remaining concrete from RMC mixer

Based on complaint received regarding above issues, site was visited Jointly by the representatives of Lands, Engineering, GM (Forest) and Planning (Environment cell) on 19.05.2023

Following are corrective measures suggested:-

**Point no.1 Filling of plot by debris on plot near crematorium**

Debris filling is going on from long time near crematorium and same can be seen from Google timeline images. But when site was visited by concerned officials, debris vehicles were not present and it seems that it is previously filled by unknown persons.

Lands department informed vide letter no. CIDCO/EE(UL-II)/2023/268/E-201932 dated 02.05.2023 that land has been not handed over to Mangroves Cell, Maharashtra. As per land status of available 7/12 extract, plot is under ownership of CIDCO.

Planning department have informed that at present no development projects have been planned or any other reservations on above mentioned plots.

**Suggestion**- Security Guards to be deployed in the area to avoid dumping of debris in future.

**Point no. 2 Obstruction of the tidal flow resulting in destruction of Mangroves**

The flap gate operation installed by CIDCO is flood control measure and gates are operated only during monsoon season as reverse flow causes floods and these flap gates are operating properly and no gate is permanently closed as claimed by Complainant.

**Suggestion:** Flap gate operations to be checked regularly once in a month

**Point no. 3** Concrete mixer throwing remaining concrete from RMC mixer

It is observed that empty Concrete mixer might have washed by unknown persons on the fanning portion of the existing bund road constructed Nhava Grampanchayat under GIA from CIDCO. It is seen that there is no concreting done at site and the said soil is removable by hand.

**Suggestion:** The committee suggested measures should be taken to increase surveillance by security in this area so as to avoid such incidents in future.

(S.A Mendhekar)
**AEE (Environment cell)**

(G.V. Hingane)
**AE (Forest)**

(G.A. Nirphal)
**Surveyor**

(S.A. Mundada)
**AEE(UL-II)**

(V.L. Pitale)
**EE(UL-II)**

**To,**

**Chief Security Officer – For necessary action pl.**

**Copy for information,**

**CVO**

**CE(NM)**

**GM(Forest)**

**CLSO(LA)**

**Sr Planner ( Environment cell)**

**Sr Planner ( South)**

**SE(D&U)**

**CCUC**

**CUC(Ulwe)**

c/13

ra md@cidco.maharashtra.gov.in

Regarding Mangrove Committee Complaint No.224

**From :** APCCF Mangrove cell <ccfmmumbai@gmail.com> Mon, Jun 19, 2023 06:10 PM

**Subject :** Regarding Mangrove Committee Complaint No.224 1 attachment

**To :** md@cidco.maharashtra.gov.in, Commissioner Nmmc <commissioner@nmmconline.com>, collector raigad <collector.raigad@maharashtra.gov.in>, Tahasildar Mahasul Raigad <tahasildarmahasul@gmail.com>

**Cc :** commissioner office konkan division <padivcomkon@gmail.com>, उपवनसंरक्षक अलिबाग <dcfalibag@gmail.com>, DCF Mangrove Cell <dcfmangrovecell@gmail.com>

Inward No. 777/E-220412
Date 26/06/23

Md's @
Belapur Office
INW. No.: 220412
Date : 22/06/23

Sir,

Please see the attached copy.

Thanks & regards,

Office of the Additional Principal Chief Conservator of Forests,

Mangrove Cell, Mumbai

022 22694985/84

Inward No. 870/E-220412
Date 22-6-23

Mangrove 224 (13.06.2023).pdf
523 KB

matter pertain to mangroves
Hence forwarded to GM (Forest).

Jt. Planner (Forest)

GM (Forest)

6

## अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, बेक फिल्ड हाऊस, ३रा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट समोर, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई४००००१.
दूरध्वनि.०२२-२२६१४९८ ४/८५, Email: dcfmangroves[illegible]@gmail.com/konkanmangroves@gmail.com

विषय :- Destruction of Mangroves in Nhavekhadi, Near Ulwe Node, Navi Mumbai. (तक्रार क्र. 224)

जा.क्र./त्त. ले/कां.स/ 93 /सन 2023-24
फोर्ट, मुंबई - 400001 दिनांक:- 17.6.23

प्रति,

1. मा.व्यवस्थापकीय संचालक
   सिडको, नवी मुंबई.
2. मा.आयुक्त,
   नवी मुंबई महानगरपालिका.
3. जिल्हाधिकारी रायगड,
   जिल्हा रायगड.

संदर्भ:- 1. श्री.वैभव म्हात्रे यांची दिनांक 01.04.2023 रोजीची ईमेल द्वारे प्राप्त तक्रार. (प्रत संलग्न)
2. या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र./त्त.ले/कां.स/302/सन 2023-24 दि.06.04.2023.
3. श्री. बी.एन.कुमार यांची दि.10.05.2023 रोजीचा ईमेल. (प्रत संलग्न)
4. कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या दि.16.05.2023 रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार. (प्रत संलग्न)

उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वये, विषयांकित प्रकरणी श्री. वैभव म्हात्रे, जिल्हा रायगड यांनी न्हावेखाडी, उलवे नोड - नवी मुंबई येथे हजारो कांदळवन नष्ट करून रामबाग मार्केट बांधण्यात आले असून, [illegible] रामबाग मार्केटसमोरील मागील प्रवेशद्वाराजवळील अजून काही कांदळवने नष्ट केले जात असल्याबाबतची तक्रार कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीस प्राप्त झाली होती. सदर तक्रार अर्जान्वये बेकायदेशीर कामे थांबविण्याबाबत कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतची विनंती तक्रारदार यांनी [illegible] करण्यात आली होती. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.2 अन्वये, सदरची तक्रार आपणाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आली होती. परंतु या तक्रारी संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस [illegible] आहे. तसेच संदर्भ क्र.3 अन्वये प्राप्त पत्राचे अवलोकन केले असता दि.06.04.2023 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी उरण, जि.रायगड यांच्या कडे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने दि.08.05.2023 रोजी अर्जदार श्री. वैभव म्हात्रे यांच्यासह स्थळपाहणी झाल्याचे निदर्शनास आले असून, सदर क्षेत्र सिडको यांच्या अखत्यारीत असल्याचे सदरच्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

त्याची संदर्भ क्र.4 अन्वये, या तक्रारीच्या अनुषंगाने समितीत झालेल्या चर्चेनुसार सदर तक्रारी संदर्भात आपल्या विभागाकडील कार्यवाहीचा अहवाल अद्यापही प्राप्त नसल्याने मा.अध्यक्षांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल, पंचनामा, संबंधित जागेचे Geo tagged छायाचित्रांसहित माहिती समितीस उपलब्ध करून द्यावयाचे निर्देश दिले आहेत.

कृ.मा.प

तरी, सदर तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या पुढील बैठकीपूर्वी समितीस उपलब्ध करुन द्यावा, ही विनंती.

(अनिता पाटील)
सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

सोबत : मंजूर इतिवृत्ताची प्रत.

प्रतिलिपी:- 1. मा. अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. उप वनसंरक्षक, अलिबाग, जिल्हा रायगड यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव.

अर्जदार :- श्री वैभव राघो म्हात्रे, मो नं ८८७९४७२६४९

राहणार :- मु. पो. न्हावे, ता. पनवेल, जि. रायगड

विषय :- खारफुटीचे कत्तल व समुद्राचे पाणी अडवून खारफुटी वृक्षास पाणी पुरवठा खंडीत केल्याबाबत.

महोदय,

आपणांस या अर्जाव्दारे विनंती करण्यास कारण की, न्हावे खाडी उत्तरपाडा (स्मशान भूमीच्या बाजुच्या परिसरात) अज्ञात व्यक्ती कडून खारफुट वृक्षाची मागील ६ ते ७ दिवसापूर्वी मोठ्या प्रमाणात कत्तल केली आहेत. तसेच न्हावे खाडी येथील रामबागच्या दिशेने येणा-या समुद्राच्या मार्गातील (मोरी/उघड) येथ पाईपला फ्लॅअ पत्रा टाकून समुद्राचे पाणी खंडीत केले आहे. पर्यायाने खारफुटीच्या वृक्षाला पाणी पुरवठा न झाल्याने ते सुकत आहेत व त्या जागेवर काही व्यक्तीकडून भराव सुध्दा केला जात आहे. तसेच खारफुटी वृक्ष मारण्यासाठी किटक नाशा औषधांचा सुध्दा वापर केला जात आहे.

दिनांक ०५/४/२०२३ रोजी सदर ठिकाणी टाकूर इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि (T.I.P.L) या कंपनीच्या मालकीचे सिमेंट कॉंक्रीट मिक्सर ( ट्रक नं MH46 3217) व्दारे शिल्लक कॉंक्रीट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकण्यात आले व अनेक वेळा असे प्रकार घडले आहे हयामुळे तेथील खारफुटी मरण पावली आहे.

तरी आपणांस विनंती की, या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देवून त्यासाठी उपाययोजना करण्यात यावी व संबंधीतांवर कायदेशिर कडक कारवाई करावी हि आपणांस नम्र विनंती.

मे. जा. व्हावे, कळावे,

आपला विश्वासू,

श्री वैभव राघो म्हात्रे

सोबत :- खारफुटी तोडल्याचे, खारफुटीवर भराव केलेले, पाणी अडवल्याचे व खारफुटीवर कॉंक्रीट टाकल्याचे फोटो जोडत आहोत.

... अधिकारी,
... संधारण घटक
...

आवक क्र. - 198
दिनांक 18/04/2023

कर्मचारी ... अधिकारी

प्रति,

वरिष्ठ नियोजनकार (पर्यावरण)
चवथा मजला, सिडको, बेलापूर.

दिनांक:-06/06/ २०२३

**विषय**:- न्हावे खाडी येथे कांदलवन (खारफुटी) तोडून त्या ठिकाणी केलेल्या अतिक्रमणा बाबत.

**अर्जदार** :- श्री. वैभव राघो म्हात्रे ,मु.पो. न्हावे ,ता. पनवेल .

महोदय ,

आपणास या अर्जाद्वारे विनंती करण्यास कारण की, न्हावे खाडी उत्तर पाडा येथे उभारण्यात आलेली रामबाग हि सिडकोच्या मालकीच्या जमिनीवर व कांदलवन तोडून कायम स्वरूपाचे बांधकाम, कमान, गार्डन व पार्किंग झोन आपल्या मालकीचे असलेल्या सर्व्हे नं. मध्ये खालील प्रमाणे अनधिकृत बांधकाम करण्यात आलेले आहे.

| अ. नु. | सर्व्हे नं. | करण्यात आलेले बांधकाम |
|---|---|---|
| १) | १४/२ | रामबाग - मागील कमान |
| २) | ५ अ/३९७ | रामबाग - समोरील कमान |
| ३) | १४/४, १४/५, १४/११, १४/१४, १४/२२, १४/२६, १४/२८ ,१४/२९, १४/३१, १४/३२ , १४/३८ | Waterpond, Water Fountain, Event spot, Security Cheak Point, Garden, शौचालय, मातीचे भराव, डांबरी रोड. |
| ४) | १४/३०, | पार्किंग झोन |
| ५) | ५अ/३९६, ९अ/७४० , | T.I.P.L ह्या कंपनीच्या मालकीचे हायवा डंपर (MH46 AF4781) व J.C.B. (MH46 B.1532) द्वारे(PWD रोड लगत) मातीचे भराव |
| ६) | १४/३६ | वर्तमानमध्ये खोली बांधण्यात येत आहे. |

वरील सर्व बांधकाम हे कांदलवन (खारफुटी) तोडून व सिडकोच्या जागेवर अतिक्रमण करून बांधण्यात आले आहे तरी आपणांस विनंती सदर बांधकामावर व संबधितावर कारवाई करण्यात यावी हि विनंती.

CIDCO/PLNG (ENV. CELL)
Inward No. 843
Date 6-6-2023

Inward No. 98
Date 16/06/2023

आपला विश्वासू ,

श्री. वैभव राघो म्हात्रे

मो.नं. ८८७९४७२६४९

AEE (Env) 

(P.T.O.) →

क्र. सिडको/का.अ. (उलवे-II)/२०२३/511/ई-219829

दि. २०.०६.२०२३

प्रति

श्री. वैभव राघो म्हात्रे
मु. पो. न्हावे, ता. पनवेल,
जि. रायगड
मो. क्र. ८८७९४७२६४९.

**विषय:- खारफूटीची कत्तल व समुद्राचे पाणी अडवून खारफुटी वृक्षास पाणी पुरवठा खंडित केल्याबाबत.**

संदर्भ :-१. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. १२.०४.२०२३
२. अर्जदार श्री . वैभव राघो म्हात्रे यांचे पत्र निरंक दि. ०६.०६.२०२३

महोदय,

उरोक्त विषयान्वये संदर्भिय पत्र क्र. १ नुसार आपण अज्ञात व्यक्तीकडून खारफुटी वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल व रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील (मोरी /उघड) येथे पाईप चा फ्लो पत्रा टाकून खंडित केल्याबद्दल व सिमेंट कॉंक्रिट मिक्सव्दारे शिल्लक कॉंक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकत आहेत अशी माहिती सिडकोला कळविली होती.

सिडको कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्र. सिडको/का. अ.(उलवे-२)/२०२३/३४९/ई-२०८०१९, दि. १०.०५.२०२३ सिडकोचे उलवे येथील सुरक्षा अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी पत्र पाठविले होते. पत्राची कॉपी सोबत जोडली आहे.

यानंतर सिडकोने वरील तक्रारीची खातरजमा करण्यासाठी एक समिती तयार केली. सदर समितीमध्ये नियोजन, भूमी. अभियांत्रिकी, व अनधिकृत बांधकामे विभाग यांचे प्रतिनिधी होते. सदर समितीने दि. १९.५.२०२३ रोजी नमूद ठिकाणची पाहणी केली.

पाहणी नंतर खालील निर्णय घेण्यात आले आहेत.

१. जमिन भराव व खारफुटी वृक्षाची तोड व कत्तल थांबविण्यासाठी सिडकोतर्फे सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यासंदर्भात सुरक्षा अधिकारी यांना कळविण्यात येईल.

२. रामबागच्या दिशेने येणाऱ्या समुद्राच्या मार्गातील पाण्याचे प्रवाह खंडित न करण्यासाठी सिडकोचे अधिकारी दर महिन्याला न्हावा खाडी येथील फ्लॅप गेट येथे भेट देवून पाहणी करतील व पाणी नियंत्रित आहे किंवा कसे याचे निरीक्षण करतील.

३. सिमेंट कॉंक्रिट मिक्सरमधील शिल्लक कॉंक्रिट हे खारफुटी व खाडीमध्ये टाकल्याचे आढळले नाही. परंतु अज्ञात व्यक्तीव्दारे रिकामे कॉंक्रिट मिक्सर तिथेच धुतल्याचे आढळले. अशी भविष्यात घटना पुन्हा घडू नये यासाठी सिडको सुरक्षा रक्षकांना सुचना करण्यात येतील.

वरील माहिती आपल्या विनंतीनुसार लेखी स्वरुपात देण्यात येत आहे.

आपला विश्वासु

(सही)

(वि. ल. पितळे)
कार्यकारी अभियंता (उलवे-II)
१ला मजला, उन्नती कमर्शियल कॉम्प्लेक्स,
सेक्टर १९ए, उलवे नोड
नवी मुंबई ४१० २०६

प्रत,

अधिक्षक अभियंता (उलवे व द्रोणागिरी)

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

नियंत्रक अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई)

वरिष्ठ नियोजनकार (Env. Cell)

महाव्यवस्थापक (वने)

क्र. सिडको/का.अ.(उलवे-II)/२०२३/ई- 544/E-221866

दि. २७/०६/२०२३

विषय:- भरती ओहोटीचा प्रवाह तात्काळ सुरु करुन Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन लागवड करणेबाबत.

संदर्भ:- १. जा.क्र.ब/कांदळवन तक्रार/४७६/२०२३-२४ दि. १७.०५.२०२३ रोजीचा परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांचे पत्र.

२. आपले पत्र क्र. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०४०/E-२१२९३० दि. २६.०५.२०२३ रोजीचा पत्र दि. ०७.०६.२०२३ रोजी का. अ. (उलवे-२) या विभागात प्राप्त.

३. श्री. वैभव रायो म्हात्रे यांचेकडील दि.०६.०४.२०२३ रोजीचा अर्ज.

४. पत्र क्र. सिडको//का.अ.(उलवे-II)/२०२३/ ५११/ ई-२१९८२९ दि. २०.०६.२०२३

आपले संदर्भिय पत्र क्र. २ सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/२०४०/E-२१२९३० दि. २६.०५.२०२३ अन्वये आपण सदर ठिकाणी भरती ओहोटीचा प्रवाह तात्काळ सुरु करुन Fish Bone Type चर खोदून त्यावर परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांनी म्हटल्याप्रमाणे कांदळवन लागवड करावी असे या कार्यालयास कळविले होते.

त्या अनुषंगाने मौजे न्हावे (उत्तरपाडा), ता. पनवेल येथे दि. २६/०६/२०२३ रोजी सिडको अधिकारी व परिक्षेत्र वन विभगातील अधिकारी श्री. चंद्रकांत शंकर मोरे यांच्यासमवेत कत्तल केलेले कांदळवनच्या ठिकाणी नवीन खारफुटी वृक्ष लागवड करण्यासाठी संयुक्त भेट दिली. या भेटीत सुकलेली खारफुटी काढून त्या ठिकाणी नवीन पाच हजार (५०००) खारफुटी न्हावे (उत्तरपाडा) येथे लावावी असे परिक्षेत्र वन विभागातुन आलेल्या आधिकारी यांनी सुचविले.

या आगोदर सन २०१९ मध्ये सिडको करिता सर्व्हे क्र. २१६, आसन गाव, ता. डहाणु येथे १७.०० हेक्टर क्षेत्र १लाख ७० हजार कांदळवन रोपांची लागवड व तीन वर्ष देखभाल महाव्यवस्थापक (वने) या विभागाने परिक्षेत्र वनविभाग यांच्या कडून केली आहे.

तक्रारीचे निवारण करण्यासाठी सिडकोने एक समिती गठित केली होती ज्यामध्ये सिडकोचे भूमी विभाग, वरिष्ठ नियोजनकार विभाग (Environment cell), मुख्य नियंत्रक अनाधिकृत बांधकाम विभाग, महाव्यवस्थापन (वने), अभियांत्रिकी विभाग केली होती. यांचे प्रतिनिधी यांनी देखील दि. १९.०५.२०२३ रोजी संयुक्त स्थळ पाहणी केली होती व श्री. वैभव म्हात्रे यांना संदर्भ क्र. ४ च्यापत्राव्दारे सिडकोने घेतलेले निर्णय कळविले होते.

तरी, सदर क्षेत्रामध्ये भरती ओहोटीचा प्रवाह तात्काळ सुरु करुन Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन **लागवड कशा प्रकारे करावी** व आपल्या विभागामार्फत करावयाचे असल्यास आपण परिक्षेत्र वन अधिकारी, उरण यांना पत्र लिहून सदर कामाची अंदाजित किंमत घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.

सोबत पत्राच्या प्रती जोडलेल्या आहेत

(वि. ल. पितळे)
कार्यकारी अभियंता (उलवे-II)

O/C

प्रत
अधीक्षक अभियंता (उलवे व द्रोणागिरी)

महाव्यवस्थापक (वने)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

सिडको

(सीआयएन - यु ९९९९९ एमएच १९७० एसजीसी - ०१४५७४)

नोंदणीकृत कार्यालय :
निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : ००-९१-२२-६६५० ०९००
फॅक्स : ००-९१-२२-२२०२ २५०९

मुख्य कार्यालय :
'सिडको' भवन, सी बी डी बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४
दूरध्वनी : ००-९१-२२-६७९१ ८१००
फॅक्स : ००-९१-२२-६७९१ ८१६६

संदर्भ क्र. सिडको/महाव्यवस्थापक (वने)/२०२३/2070

दिनांक : १२.०७.२०२३

प्रति
परिक्षेत्र वन अधिकारी (उरण)
जे.एन.पी.टी.टाऊनशिप,
सेक्टर-२, बी-५८, रूम नं-२
ता.उरण जि.रायगड.

**विषय: भरती ओहोटी प्रवाह तात्काळ सुरु करून Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन लागवड करणेबाबत.**

**संदर्भ** : १) आपले पत्र क्रमांक- जा.क्र.व/कांदळवन तक्रार /४७६/२०२३-२४ दि:१७.०५.२०२३
२) श्री.वैभव राघो म्हात्रे यांचेकडील दि.०६.०४.२०२३ रोजीचा अर्ज.

वरील विषयाला अनुसरुनचे संदर्भीय पत्र क्रमांक-०१ सदर कार्यालयास प्राप्त झाले होते.सदर पत्रात आपण श्री.वैभव राघो म्हात्रे यांच्या संदर्भीय पत्र क्रमांक-०२ चा उल्लेख केला होता.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे.न्हावे (उत्तरपाडा) येथे करण्यात आलेल्या स्थळ पाहणीच्या आधारे आपण सदर ठिकाणी कांदळवन वृक्ष तोड झाल्याचे म्हटले आहे.

तसेच सदर प्रकरणी भरती ओहोटी चा प्रवाह तात्काळ सुरु करून Fish Bone Type चर खोदून त्यावर कांदळवन लागवड करण्यात यावी असे म्हटले आहे.

तरी सदर ठिकाणी भरती ओहोटी चा प्रवाह तात्काळ सुरु करून चर खोदून त्यावर कांदळवन लागवड करण्यासाठी आपल्या विभागाकडून कांदळवन संधारण घटक विभागाच्या साहाय्याने कार्यवाही करण्यात यावी हि विनंती.

13/7/23

महाव्यवस्थापक (वने)

सोबत :संदर्भीय पत्र क्रमांक- १.२.

**प्रत माहितीस्तव** : अधिक्षक अभियंता (उलवे व द्रोणागिरी).

भ्रष्टाचारासंबंधी कुठल्याही तक्रारीसाठी कृपया या संकेतस्थळाला भेट द्यावी.
**www.cidco.maharashtra.gov.in** दक्षता या लिंकवर क्लिक करावे.

Scanned with CamScanner